# प्रकरण ५

## निष्कर्ष व शिफारशी

५:१ प्रस्तावना

५:२ बी.एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दती या पाठ्यक्रमाच्या उद्दिष्टांविषयी निष्कर्ष व शिफारशी.

५:३ बी.एड्. पदवी संपादन करुन नोकरीत असलेल्या मराठी शिक्षकांच्या सर्वसाधारण माहितीविषयी निष्कर्ष व शिफारशी.

५:४ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या सर्वसाधारण माहितीविषयी निष्कर्ष व शिफारशी.

५:५ बी.एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतींच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भागाविषयक निष्कर्ष व शिफारशी

५:६ मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक कार्याविषयक निष्कर्ष व शिफारशी.

५:७ मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम अधिकाधिक समृध्द व संपन्न करण्यासंबंधी निष्कर्ष व शिफारशी.

५:८ मराठी अध्यापन पध्दती या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक कार्य अधिकाधिक समृध्द व संपन्न करण्यासंबंधी निष्कर्ष व शिफारशी.

५:९ सर्वसाधारण निष्कर्ष व शिफारशी.

५:१ प्रस्तावना :

प्रस्तुत शोधप्रबंधामध्ये "बी.एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचा चिकित्सात्मक अभ्यास" केलेला आहे. तो याच हेतूने की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयातून मराठीच्या अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचा अभ्यास त्यातील दौर्बल्य काढून टाकून तो सामर्थ्यशाली व्हावा. मागील प्रकरणात [प्रकरण क्रमांक ४] शिक्षकांच्या प्रश्नावली व मराठी अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावली व मुलाखतीद्वारे प्राप्त झालेल्या सामग्रीचे विश्लेषण व वर्गीकरण केले असून अन्वयार्थ लावला आहे. प्रस्तुत प्रकरणामध्ये त्यावर आधारित "निष्कर्ष व शिफारशी" सादर केलेल्या आहेत.

५:२ बी.एड्. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दती या पाठ्यक्रमाच्या उद्दिष्टांविषयक निष्कर्ष व शिफारशी :

१] सारणी क्रं.४.१२ वरून असा निष्कर्ष काढता येतो की, मराठीचे [मातृभाषा] अभ्यासक्रमातील तसेच बालकाच्या शिक्षणातील स्थान आणि महत्त्व समजण्यास मदत होते. कारण पाठ्यक्रमांतर्गत विचारलेल्या घटक क्रं.१ मधील गुणांचे प्रमाण ९०% आहे व अवगुणांचे प्रमाण १०% आहे.

२] पृष्ठांक १०४ वरून असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे याबाबतचे ज्ञान मिळविण्यास मदत होते.

३] मराठीच्या अभ्यासक्रमाचे ज्ञान मिळविण्यास व त्याचे विश्लेषण करण्यास मदत करणे या उद्दिष्टा अंतर्गत असे नमुद करता येईल की हे उद्दिष्ट २०% परिपूर्ण होत नाही. या उद्दिष्टाशी संबंधित काही शिफारशी करण्यात आलेल्या आहेत.

३.१] मराठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके ही कालोचित असणे आवश्यक आहे.

३.२] मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील घटक क्रं.३ मध्ये नेमकेपणा अधिक स्पष्ट व्हावा.

३.३] मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रमासाठी अध्यापनाचा कालावधी

लक्षात घेता घटक क्रमांक ३ मोठा आहे. त्यामुळे हे उद्दिष्ट परिपूर्ण होण्यासाठी वेळ कमी पडतो.

३.४] हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी असणाऱ्या मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाच्या रचनेची पुरेशी कल्पना यावी.

मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील संबंधित उद्दिष्ट परिपूर्ण होण्यासाठी वर नमुद केलेल्या शिफारशींचा विचार करण्यात यावा व पाठ्यक्रमात मराठी अभ्यासक्रमाचे ज्ञान मिळविण्यास व त्याचे विश्लेषण करण्यास उपयुक्त घटक घालावा.

४] मराठी पाठ्यपुस्तकांचे चिकित्सक परीक्षण करण्यास तसेच आशय विश्लेषणास मदत करणे हे उद्दिष्ट साध्य होण्यासाठी मराठी आशययुक्त अध्यापन पद्धतीचे कृतिसत्र उपयुक्त ठरते. हे सारणी क्रमांक ४.३४ वरून [पृष्ठांक १३० ] स्पष्ट होते. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी पाठ्यपुस्तकांचे चिकित्सक परीक्षण करण्यास तसेच आशय विश्लेषणास मदत होते.

५] सारणी क्रमांक ४.२२ [पृष्ठांक ११३ ] वरून असा निष्कर्ष काढता येतो, कथन अध्यापन पद्धतीचा सर्वाधिक उपयोग [८५.७१%] केला जातो. अध्यापनातील प्रयुक्त्या व तंत्रे यावर प्रश्नावलीत शोध घेण्यात आलेला नाही. त्यामुळे या भागाचा उहापोह करणे योग्य नाही. (पण काही अध्यापन पद्धतींची शिफारस करण्यात आलेली आहे.)

५.१] सध्याच्या आंतरराष्ट्रीय घडामोडी आशय स्वरूपात व्यक्त करता येणारी अध्यापन पद्धती हवी.

५.२] भाषांतरित व रूपांतरित वाङ्‌मयाच्या अध्यापनाची पद्धती असावी.

६] सारणी क्र.४.२०, [पृष्ठांक ११९ ] व सारणी क्रं.४.२१, [पृष्ठांक ]
वरून असा निष्कर्ष काढता येतो की, मराठीचे अध्यापन करताना विविध अध्ययन अनुभवांची व अध्यापन साहित्यांची मदत घेण्यास हा पाठ्यक्रम उपयुक्त आहे. तथापि अध्यापन साहित्याची तात्त्विक माहिती देणाऱ्यांचे प्रमाण ८९.२८ टक्के इतके म्हणजे अधिक आहे.

७• सारणी क्र•४•२४ पृष्ठांक [ १२५ ] वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, भाषा अध्यापनाचे नियोजन व संघटन करण्याचे कौशल्य प्राप्त करण्यास मदत करणे, हे उद्दिष्ट पूर्ण करता येते•

८• सारणी क्र•४५, पृष्ठांक [ १२५ ] वरुन अशी शिफारस करण्यात येते की विद्यार्थ्यांच्या गरजानुरूप पाठाची विविध प्रकारची टाचणे तयार करण्याचे कौशल्य प्राप्त होण्यासाठी पाठ्यक्रमाच्या प्रात्यक्षिक कार्यात पाठटाचणाचे नमुने अभ्यासक्रमास दयावेत व तशा स्वरूपाचा भाग पाठ्यक्रमातील घटकात समाविष्ट करावा•

९•१•सारणी क्रमांक ४•२८ पृष्ठांक [ १२१] वरुन मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन करण्यासाठी काही शिफारशी करण्यात आलेल्या आहेत•

९:१ मराठी भाषेचे सामर्थ्य अंगिकारण्यास सामर्थ्याची गोडी अनुभवावी लागते•

९•२ शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणात सुधारित मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचे प्रशिक्षण देणे•

९:३ मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील घटक, आशय, तंत्रे व या सर्वांची दर तीन वर्षांनी पुनर्रचना करणे•

९:४ पाठ्यक्रमाची रचना अनुभवाधिष्ठित असावी•

९:५ गद्यात्मक, पद्यात्मक घटकांचे सखोल ज्ञान प्राप्त करण्यासाठी कृतीवर आधारित पाठ्यक्रमात घटक असावा•

१०• सारणी क्र•४•४७ [ पृष्ठांक १४९ ] आणि सारणी क्र• ४•४८ [पृष्ठांक १५० ] वरुन असा समजण्यासाठी निष्कर्ष काढण्यात येतो की, मूल्यमापनाची तंत्रे समजण्यासाठी व त्यांचा उपयोग करण्यासाठी मदत करणे हे उद्दिष्ट साध्य होते• कारण मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमाबद्दल समाधानी आहोत• असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची टक्केवारी ८०•०० आहे• आणि मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमा बद्दल आपण समाधानी नाही असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची टक्केवारी फैवत २०•०० आहे• ही टक्केवारी नगण्य आहे•

११. सारणी क्र.४.१२ वरून मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील "भाषा शिक्षक" या घटकामुळे शिक्षकांचे अंगी असणारे गुण विशेष व कौशल्ये प्राप्त करण्यास मदत होते.

५:३ बी.एड्. पदवी घेऊन नोकरीत असलेल्या, मराठी विषयाचे अध्यापन करत असलेल्या शिक्षकांच्या सर्वसाधारण माहिती विषयी निष्कर्ष व शिफारशी. :-

प्रस्तुत विभागात प्रकरण क्रमांक पाचमधील उपघटकांचा विचार केला असता अधिव्याख्यात्यांच्या व शिक्षकांच्या प्रश्नावलीद्वारे आलेल्या सामग्रीचे विश्लेषण करून अन्वयार्थ लावल्या नंतर जे निष्कर्ष निघतात त्याचे विवरण केलेले आहे व त्यावर आधारित शिफारशी केलेल्या आहेत.

चौथ्या प्रकरणातील सारणी क्र.४:१ नुसार [ पृष्ठांक ] शिक्षकांची पदवी, पदव्युत्तर पदवी आणि बी.एड्. परीक्षेला घेतलेल्या अध्यापन पद्धती तसेच माध्यमिक शाळेत अध्या शिकविणारे विषय याबाबत आहे. या सारणीच्या आधारे असे स्पष्ट होते की, १३ शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील १४० शिक्षकांच्या पदवीचा विषय"मराठी" हा आहे. पदव्युत्तर परीक्षेला मराठी विषयाचीच निवड केलेली आहे. आणि बी. एड्. पदवी परीक्षेला सुद्धा मराठी हीच मुख्य अध्यापन पद्धती निवडली आहे. या शिक्षकांची माध्यमिक प्रशालेत मराठी सहशिक्षक या पदाखाली नेमणूक केली आहे. मराठी विषयाबरोबर इतिहास, भूगोल ,हिन्दी, अर्थशास्त्र या विषयाचेही अध्यापन करावे लागते. १९९३-९४ या शैक्षणिक वर्षा मध्ये मराठी विषयातून पदवी किंवा पदव्युत्तर पदवी नसतानाही त्यांना "मराठी" ही अध्यापन पद्धती घ्यावी लागलेली आहे. अर्थात शिक्षणशास्त्र महाविद्यालयात मराठीचे अध्यापन केल्यानंतर त्यांना "मराठी" विषय माध्यमिक शाळेत शिकविण्यास दिला पाहिजे. यावरून अशी शिफारस करण्यात येते की, मराठी विषयाच्या शिक्षकांना अन्य विषय सुद्धा शिकविता आले पाहिजेत. तसेच मराठी विषय शिक्षकांची नियुक्ती करताना ते पदवी आणि पदव्युत्तर पदवी तसेच बी.एड्. पदवीला "मराठी " अध्यापन पद्धती घेतलेला असले पाहिजे. या शैक्षणिक अर्हता आहेतच तरीपण त्याची काटेकोरपणे अम्मलबजावणी व्हावी.

5:4 **मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या सर्वसाधारण माहिती विषयी निष्कर्ष व शिफारशी :-**

अधिव्याख्यात्याच्या सारणी क्र. ४.२ वरुन [ पृष्ठांक ८४ ] अशी शिफारस करण्यात येते की, शिवाजी विद्यापीठाने घालून दिलेल्या शैक्षणिक अर्हता मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम शिकविणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या जवळ आहेत. पण व्यावसायीक विकास किंवा यु. जी. सी. ने. घालून दिलेल्या अटींचीसुध्दा परिपूर्तता करणे आवश्यक आहे.

प्रकरण ४ मधील सारणी क्र. ४:३ वरुन [पृष्ठांक ८४ ] अधिव्याख्यात्याचे अध्यापन व मार्गदर्शनाचे अनुभव व एकूण नोकरीचा अनुभव यासंबंधी सामग्रीचे विश्लेषण करुन अर्थ लावल्या नंतर असा निष्कर्ष काढता येतो की, शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असलेल्या पण विना अनुदान तत्त्वावर चालणाऱ्या शिवाजी महाविद्यालयात शिकविण्याचा दीर्घ अनुभव असलेले अधिव्याख्याते नाहीत. यावरुन अशी शिफारस करण्यात येते की, मराठी अध्यापन पध्दती केवळ अध्यापनाने अवगत होत नाही तर त्यासाठी अधिकाधिक अनुभूती असणे आवश्यक आहे. यासाठी दीर्घ अनुभव असणाऱ्या अधिव्याख्यात्यांची शिक्षणशास्त्र महाविद्यालयात नियुक्ती करणे अत्यावश्यक आहे.

5:5 **बी. एड. पदवीच्या अभ्यासक्रमातील मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भागाविषयक निष्कर्ष व शिफारशी :-**

सारणी क्र. ४.५ वरुन [ पृष्ठांक ८६ ] मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने योग्य आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांच्या प्रतिसादाची टक्केवारी ९२.८५ आहे. तसेच हे शिक्षक जेव्हा बी.एड. करत होते तेव्हा त्यांनी मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम अभ्यासलेला आहे. या शिक्षकांच्या मते मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने अयोग्य आहे असे म्हणणाऱ्या शिक्षकांच्या प्रतिसादाची टक्केवारी ०७.१५ आहे. संबंधित टक्केवारी ही नगण्य आहे. या टक्केवारी वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रम कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने योग्य आहे.

सारणी क्र. ४.६ वरुन [पृष्ठांक ८८ ] मराठी विषयाचा कुशल शिक्षक तयार करण्याच्या दृष्टीने मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भाग उपयुक्त आहे. असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्याच्या प्रतिसादाची टक्केवारी ९३.३३ आहे. आणि मराठी विषयाचा कुशल शिक्षक तयार करण्याच्या दृष्टीने मराठी अध्यापन पध्दतीचा पाठ्यक्रमातील तात्त्विक भाग उपयुक्त नाही असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्याच्या प्रतिसादाची टक्केवारी ०७.७७ आहे. ही टक्केवारी दुर्लक्षणीय आहे. तरीही अधिव्याख्याते व शिक्षकांनी पाठ्यक्रमा बाबत पुढील शिफारशी केलेल्या आहेत.

१. मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमा संदर्भात पुरेसे संदर्भ वाचन देणे आवश्यक आहे. या वाचनाचा अध्यापना मध्ये कसा समावेश करता येईल. याबद्दल पुरेशी माहिती देणे आवश्यक आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावलीतील सारणी क्रमांक ४.८ [ पृष्ठांक ९० ] मध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील घटक १ - मराठीचे अभ्यासक्रमातील स्थान , घटक -२, मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे , घटक - ४, मराठी मराठी अध्यापनाच्या विविध पध्दती , प्रयुक्त्या व तंत्रे, घटक - ५, अध्ययन अनुभव व अध्यापन साहित्य, घटक - ६ अध्यापनाचे नियोजन व संघटन, घटक ८ मूल्यमापन पध्दती, घटक -९, भाषा शिक्षक या घटकाना व अत्यंत उपयुक्तता मिळाली आहे. आणि घटक ३ - मराठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके, घटक "७ मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाचे अध्यापन या घटकाना"उपयुक्त "श्रेणी मिळाली आहे. यावरुन असा निष्कर्ष निघतो की, मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील एकूण ९ घटक शिक्षक बनण्याच्या दृष्टीने उपयुक्त आहेत.

शिक्षकांच्या प्रश्नावलीतील सारणी क्र. ४.८ [ पृष्ठांक ९० ] मध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमात आणखी काही घटकांची भर घालणे आवश्यक आहे. अशी मते नमूद केली आहेत. शिक्षकांनी सुचविलेले घटक खाली नमूद केले आहेत.

१· शुद्धलेखन शास्त्र

२· भाषांतरीत वाङ्‌मयीन अभ्यास

३· भाषा उत्पत्ती शास्त्र

४· भाषा उच्चार शास्त्र

वर नमूद केलेल्या घटकांची कारणे शिक्षकांच्या शब्दात खाली दिली आहेत·

१· सर्व अध्यापन पद्धतीच्या मुळाशी असलेली प्रथम भाषा म्हणून मराठी अध्यापन पद्धतीचे महत्त्व अधिक आहे·

२· नवीन व जुन्या वाङ्‌मयीन साहित्या बद्दल विद्यार्थ्यांना अभिरुची निर्माण करून त्यांच्यात अभिवृत्ती निर्माण करता येते· तौलनिक, समीक्षणात्मक अभ्यास करता येतो·

३· भाषा उत्पत्ती शास्त्रामुळे मराठी भाषेचा इतिहास अभ्यासता येतो· भाषेतील नवीन शब्दांचे रंग, रूप, आकार छटा समजतात·

४· भाषा उच्चार शास्त्रामुळे ग्रामीण भाषेतील अस्सल नवीन शब्दांचे अचूक अर्थ माहित होतात· शहरी भाषेमध्ये ते वापरण्याची संधी मिळते· पर्यायाने ते शैक्षणिक नवीन शब्दप्रयोग म्हणून मान्यता पावतात·

शिक्षकांनी वर नमूद केलेल्या नवीन घटक व त्यांच्या कारण मीमांसेवरून अशी शिफारस करता येते की, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमात नवीन घटकांची भर घालणे आवश्यक आहे·

अधिव्याख्यात्यांच्या प्रश्नावलीतील सारणी क्रमांक ४·९ पाठ्यक्रम व्यापक असला तरीही काही नवीन घटकांची भर घालणे आवश्यक आहे, अशी मते नमूद केली आहेत· हे नवीन घटक खाली दिले आहेत·

१· व्याकरणाचे व शुद्धलेखनाचे शास्त्र

२· अध्यापन पद्धती - गद्यात्मक पद्य व पद्यात्मक गद्य यांचा संयुक्त विचार समवाय पद्धती, नाट्यीकरण

३· भाषा विकासाचा इतिहास

४· मराठी अध्यापनाचे नमुना पाठ

५· अध्यापनाची प्रतिमाने

वरील घटकांची कारणे खाली नमूद केली आहेत·

१. व्याकरणाचे शुद्धत्व टिकविता येते.

२. सोमरिषे प्ररोल आड:मवाचे अध्यापन करता येते.

नवीन अध्यापन पद्धतीचा अविस्तर अभ्यास करुन त्याचा अध्यापनात प्रत्यक्ष वापर करता येतो.

३. जागतिक पातळोवर मराठीचे स्थान अभ्यासता येते.

४. मराठी अध्यापनाच्या प्रतिमानामुळे मराठी संकल्पना, सुबोध, स्पष्ट करता येतील. प्रशिक्षण चांगले होइल. ज्ञान व मनोरंजन वाढीस लागेल.

अधिव्याख्यात्यानी नमूद केलेल्या घटका-रुन व कारणाचा अभ्यास करता अशी शिफारस करता येईल की, अधिव्याख्यात्यानी सूचविलेले नवीन घटक योग्य आहेत. त्या घटकांचा अंतर्भाव पाठ्यक्रमात होणे आवश्यक आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावलीमधील सारणी क्र ४.११ [पृष्ठांक ] - ध्ये मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील घटकांच्या उपयुक्ततेच्या मतावरुन सा निष्कर्ष काढता येतो की, मराठी अध्यापन पद्धतीच्या घटकातील गुणानुक्रमे , २, ३, ९, ३, ६, ५, ४ हे घटक कुशल शिक्षक बनण्याच्या दृष्टीने धिक उपयुक्त आहेत.

प्राध्यापकांच्या प्रश्नावली मधील सारणी क्र. ४.१२ [पृष्ठांक ध्ये संबंधित घटकांचे गुणावगुण नमूद केले आहेत.

संबंधीत पाठ्यक्रमातील घटकांचे गुण अवगुण पुढील प्रमाणे स्पष्ट तात.

अभ्यासक्रमातील मराठीचे स्थान :-

मूलभूत संकल्पना समजण्यास आवश्यक आहे.

संस्कृतीची ओळख व मातृभाषेबद्दल आदर निर्माण होतो.

मराठी भाषा मातृभाषेचे एक साधन म्हणून योग्य आहे.

मराठी भाषेचे अभ्यासक्रमातील स्थान सांगणारी वैशिष्ट्ये योग्य.

मराठी विषय का महत्त्वाचा तो समजते.

मराठी भाषेची अनेक दृष्टीने असणारी आवश्यकता आणि महत्त्व समजते.

मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील हा घटक अत्यंत उपयुक्त आहे.

१०

मराठी बद्दल आत्मियता निर्माण होते.

अवगुण- जागतिक पातळीवर मराठीचे स्थान सांगणे आवश्यक आहे.

त्यामुळे कृतीचा अभिमान बाळगणार नाही.

२. मराठी अध्यापनाचे हेतू व उद्दिष्टे :-

गुण- हा घटक प्रशिक्षणार्थ्यांना मार्गदर्शी व स्वीकारार्ह आहे.

मराठीच्या प्रशिक्षणार्थ्यांना काय व का शिकवायचे ते समजते.

सफलतेच्या दृष्टीने चांगले, परिपूर्ण आहे.

मराठीच्या अध्यापनाची उद्दिष्टे आत्मसात केल्याने एक नवी दृष्टी मिळते.

मराठीचे प्रथम भाषा म्हणून अध्यापनातील स्थान कळते.

अवगुण- काहीही नाहीत.

३. मराठी अभ्यासक्रम व पाठ्यक्रम पुस्तके :-

गुण- अध्यापनाला दिशादर्शी, उपयुक्त साधन आहे.

पाठ्यपुस्तकाचा चिकित्सक अभ्यास करता येतो.

माहितीच्या दृष्टिने योग्य, परिपूर्ण, विश्लेषणात्मक गुणवत्ता.

आधारभूत साधन विवेचन

अवगुण- कालोचित असणे आवश्यक आहे.

नेमकेपणा अधिक यावा.

कालावधी लक्षात घेता मोठा आहे. वेळ कमी पडते. मराठी अभ्यासक्रमाच्या रचनेची पुरेशी कल्पना येत नाही.

४. मराठी अध्यापन पद्धती, प्रयुक्त्या व तंत्रे :-

गुण- प्रभावी व कृतीशील अध्यापनाला उपयुक्त आहे.

विविध अध्यापन तंत्राचा परिचय होतो.

प्रयुक्त्या व तंत्रे यांचा समाधानकारक उपयोग होतो.

स्तरानुसार व आशयानुसार पद्धतीचा वापर करता येतो.

प्रशिक्षणार्थ्यांना अत्यंत उपयोगी आहे.

अवगुण :- आणखी काही नवीन अध्यापन पध्दतीचा समावेश करावा
नाविन्याचा अभाव आहे.

५. अध्ययन अनुभव अध्यापन साहित्य :-

गुण :- मौलिक
आशयानुसार साहित्य साधने तयार करता येतात.
या घटकाचा समावेश योग्य आहे.
विविध अध्ययन अनुभवाची पुरेशी कल्पना येते.
अध्यापन साहित्याचा विविधांगी आढावा घेता येतो.
प्रशिक्षणार्थ्यांना उपयुक्त घटक आहे.

अवगुण :- अध्यापन साहित्य हाताळण्याच्या कौशल्याचा अभाव आहे.
कालावधीच्या दृष्टिने घटक मोठा आहे.

६. :- अध्यापनाचे नियोजन व संघटन -

गुण :- पूर्वतयारीस अत्यावश्यक
मूल्यमापनासाठी आवश्यक माहिती मिळते.
माहितीच्या दृष्टिने योग्य घटकांचा समावेश केला आहे.
वेळेची बचतकरण्याच्या दृष्टिने घटक योग्य आहे.

अवगुण :-नियोजनास प्रबोधन करण्याची गरज आहे.

७. मराठी भाषेची व्याप्ती, उपयोगिता समजते.

वेगवेगळ्या भागांचे अध्यापन कसे करावे हे समजते.
वेगवेगळ्या भागांचे अध्यापन कसे करावे ह समजते.
तात्त्विक भाग योग्य आहे.

भाषिक कौशल्यांच्या मूल्यमापन संवर्धनासाठी उपयोग होतो.
घटका मध्ये परस्पर पुरकता आहे.

अवगुण :- गद्यातील पद्यातील विविध घटकांचे सखोल अध्यापन विषयक ज्ञान मिळत नाही.

कृतीमध्ये अम्मलबजावणी व्हावी.

८. :- **मूल्यमापन पद्धती :-**

गुण :- आकलन चाचणी शक्य असते.

मूल्यमापनाची गरज असते.

मराठी विषयाच्या मूल्यमापनातील वेगळेपण समजते.

सर्व उपक्रमांचा आढावा घेता येतो.

आवश्यक व अपरिहार्य घटक आहे.

अवगुण :- केवळ मातृभाषेच्या दृष्टीने विचार होणे आवश्यक आहे.

५:६ :- **मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक कार्य विषयक निष्कर्ष व शिफारशी :-**

सारणी क्र. ४.१० [ पृष्ठांक २२४ ] वरून अध्यापन पद्धती मराठी अध्यापन पद्धतीच्या प्रात्यक्षिक कार्यात आणावयाच्या बाबतीत पुढील शिफारशी करण्यात आल्या आहेत.

१. अध्यापन पद्धती प्रात्यक्षिक कार्यात आणावयाचा विचार वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून केला पाहिजे.

२. विविध प्रसंगाच्या व स्पर्धांच्या माध्यमाचा वापर करून ते प्रात्यक्षिक कार्यात आणता येईल.

३. सैद्धान्तिक भाग व प्रात्यक्षिक भाग यांची सांगड घालून अनुभवी व ख्यातनाम अधिव्याख्यात्यांच्या पाठांचे दिग्दर्शन असावे. तसेच पाठांचे नियोजन करताना विविध प्रकारच्या पाठांची योजना असावी.

सारणी क्र.४.१० वरून सुचविलेल्या शिफारशी वरून असा निष्कर्ष काढता येतो की, विविध अध्यापन पद्धतींची केवळ तात्त्विक व माहिती न देता मराठी विद्यार्थी संबंधित प्रत्यक्षात त्या अध्यापन पद्धती कशा वापराव्याच्या याचे दिग्दर्शन व मार्गदर्शन देणे आवश्यक आहे.

सारणी क्र. ४.३१ [ पृष्ठांक १२६ ] वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील क्रमबध्दता प्रात्यक्षिक कार्याशी सांगड घालण्याच्या दृष्टीने योग्य आहे.

सारणी क्र. ४.३२ [ पृष्ठांक १२८ ] वरुन असा निष्कर्ष काढण्यात येतो की, शिक्षकांना सर्व साधारण सामान्य अध्यापन कौशल्य क्षमता प्राप्त करण्याच्या दृष्टीने सूक्ष्म अध्यापन कौशल्य ६०% समाधानकारक आहेत.

सारणी क्र.३३ [ पृष्ठांक १२९ ] वरुन अशी शिफारस करण्यात येते की, मराठी अध्यापन पध्दती मध्ये नवीन अध्यापन कौशल्याचा अंतर्भाव करण्यात यावा. ही नवीन अध्यापन कौशल्ये पुढील प्रमाणे अधिव्याख्यात्यांनी त्यांच्या शब्दात व्यक्त केली आहेत.

१] शास्त्रीय व शैक्षणिक उपकरणाचा सुयोग्य वापर.

२] प्रकटवाचन, मूकवाचन कौशल्य, प्रश्न कौशल्य )

३] फलक लेखन

४] स्पष्टीकरण कौशल्य

सारणी क्र. ४.३४ [ पृष्ठांक १३० ] वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, आशययुक्त अध्यापन पध्दतीचे कृतिसत्र काही अंशी समाधानकारक आहे.आशयुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्रामुळे मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील आशय व पाठ्यपुस्तकातील आशय यातील संबंधाविषयी जागृती करता येते.

आशय आणि अध्यापन पध्दती यांचे सहेतुक एकात्मिकरण करण्याच्या तत्वाचे आचरण करण्यास व त्यानुसार निरीक्षणक्षम कौशल्ये विकसीत करण्यास मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे कृतिसत्र लाभदायी ठरण्यासाठी काही शिफारशी करण्यात आल्या आहेत.

१. मराठीचे आशययुक्त अध्यापन हे अध्यापनाच्या अंगभूत कौशल्यावर आधारीत असते. कृतिसत्रातील वातावरण हे कृत्रिम असते. आशयाशी समरस होण्यास वर्गवातावरणाचीच गरज असते.

सारणी क्रमांक ४.३५ वरून [पृष्ठांक १३४ ] आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या कृतिसत्राचा आता करत असलेल्या मराठी अध्यापना मध्ये काही प्रमाणात [७८.५७%] उपयोग होतो. तर काही प्रमाणात [ २१.४२ %] उपयोग होत नाही. त्यावरून काही शिफारशी करण्यात आल्या आहेत.

१. वेगवेगळ्या अध्यापन पद्धतीने पाठ टाचणे काढता येणे आवश्यक आहे.

२. संबोधाची पूर्ण माहिती आकलन व्हावी.

३. मराठीतील पद्य विभागाचे उपमुद्दे पाडता यावेत.

सारणी क्र. ४.३७ पृष्ठांक (१३७) वरून असा निष्कर्ष काढता येतो की, पाक्षिक शाळे मध्ये राबविलेल्या उपक्रमाचा शिक्षकानाअध्यापनात आताउपयोग होतो.

सारणी क्र. ४.३८(पृष्ठांक १३८ ) वरून, अशी शिफारस करण्यात यते की,

१. प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांनी अशी शिफारस करण्यात येते की, रचना ावर किमान एक - पाठ द्यावा. कारण पाठ नियोजनाच्या वेळा पत्रकात मराठीच्या सर्व उपांगाचे घटक येते नाहीत. सरावपाठांची संख्या १६ असावी.

२. रचने बाबत तुलनेने सरावपाठ अधिक व्हावेत. कारण प्रशिक्षणात अध्यापक घडवायचा असतो. म्हणून किमान १० सरावपाठ चांगले व ६ सरावपाठ नोंदविलेले ) घाईगडबडीत घेतलेले असावेत.

सारणी क्र. ४.३९(पृष्ठांक १३९) वरून, असा निष्कर्ष काढता येतो की, सराव पाठांचे मार्गदर्शन करण्यासाठी पुरेसा वेळ न मिळता थोडासा वेळ मिळतो. याविषयी अशी शिफारस करता येईल की, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठांची व्याप्ती मोठी, क्षेत्र व्यापक, वेळ अपुरा असल्यानेमार्गदर्शनासाठी निश्चित वेळ ठरवावी.

सारणी क्र.४.४० (पृष्ठांक १४० ) वरून सलगसरावपाठाचे कार्य समाधानकारक होण्यासाठी, त्या कालावधीत त्या त्या घटकांची पुरेशी तयारी करून द्यावी. एकाच वाङ्मयीन प्रकाराचेच सलग सराव पाठ घेता यावेत. मागील सराव पाठातील त्रुटी सुधारता याव्यात.

सारणी क्र. ४.७१ (पृष्ठांक १७२) वरून सलग सरावपाठाचे नियोजन योग्य प्रकारे होण्यासाठी पुढील शिफारशी करता येतात.

१. सलग सराव पाठांची कार्यवाही योग्य असावी.
२. सलग सराव पाठांची प्रस्तावना कशी दिर्घ करावयाची त्याचे नमुने पाठ्यक्रमात असावेत.
३. शालेय कामकाज व शालेय पद्दती जाणून घेण्यावर भर दयावा.

सारणी क्र. ४.७२ (पृष्ठांक १७३) वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, पाक्षिक शाळा मधील उपक्रम मराठीचा कुशल अध्यापक बनण्याच्या दृष्टीने काही प्रमाणात समाधानकारक आहे.

सारणी क्र. ४.७३ (पृष्ठांक १७४) वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, प्रात्यक्षिक पाठ परीक्षा समाधानकारक पणे पूर्ण केल्या जातात.

सारणी क्र.४.७४ (पृष्ठांक १७५) वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, मूल्यमापन कृतिसत्राचा उपयोग होतो.

:७ मराठी अध्यापन पद्दतीचा पाठ्यक्रम अधिकाधिक समृद्द व संपन्न करण्या संबंधी निष्कर्ष व शिफारशी :-

१. सातत्याचा अभाव आहे.
२. नवीन मूल्यमापन पद्दतीचा अभ्यास व्हावा.

भाषा शिक्षक :-

तौलनिक भाषांचा व्यासंगी शिक्षक आवश्यक आहे.

मराठी भाषा शिक्षकाचे गुण समजून ते आत्मसात येतात.

स्वत:च्या क्षमतांची, गुणांची जाणीव होण्याच्या दृष्टिने हा घटक अत्यंत उपयुक्त आहे.

अवगुण :- कल्पकतेचा अभाव आहे.

वरील गुण - अवगुणांच्या संदर्भात पुढील शिफारशी कराव्याशा वाटतात.

जागतीक पातळीवर मराठीचे स्थान सांगावे. अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तकांच्या अध्यापना बाबत अधिक नेमकेपणा यावा. मराठी अभ्यासक्रमाच्या रचनेची पुरेशी कल्पना येईल असे संदर्भ वाचन दयावे. व ते उपलब्ध होतील याची योजना असावी नवीन अध्यापन पध्दतींचा समावेश करावा. अध्यापन साहित्य हाताळण्यास दयावे, ते कौशल्य असावे. अध्यापनाचे नियोजन व संघटना बाबतीत प्रबोधनात्मक मार्गदर्शनाची गरज आहे. मराठी भाषेच्या विविध अंगोपांगाच्या अध्यापनाची कृतीयुक्त अमलबजावणी व्हावी. मूल्यमापन पध्दती मध्ये सातत्य असावे. नवीन मूल्यमापन पध्दतीचा अभ्यास व्हावा. भाषा शिक्षकांनी कल्पकतेचा वापर करावा. मराठी अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तके तसेच अध्ययन अनुभव व अध्यापन साहित्य या घटकांसाठी पुरेसा वेळ असावा.

चौथ्या प्रकरणातील ४.१३ सारणीवरुन [पृष्ठांक १०५ ] असा निष्कर्ष निघतो की, शिक्षणशास्त्र महाविद्यालयात केलेले, मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमातील सरावपाठांचे अध्यापन, आता करत असलेल्या नोकरीतील अध्यापन कार्यास उपयुक्त ठरते.

अशा प्रकारे १ या सदराखाली आलेली उत्तरे खाली नुमद केली आहेत.

१] सरावपाठामुळे अध्यापन कार्यात धाडसीवृत्ती निर्माण होते.

२] सरावपाठांमुळे भाषिक कौशल्य प्राप्त होते.

३] सराव पाठातील अध्यापनातून माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद साधता येतो.

४] माध्यमिक शाळेतील स्तरानुसार अध्यापन पध्दती बदलता येते.

५] अध्यापनात विविध प्रयुक्त्या, तंत्रे, शैक्षणिक साधनांचा वापर करुन अध्यापन सुधारता येते.

६] विद्यार्थ्यांचा पूर्वानुभवानुसार अध्यापन पातळी समजू शकते.

७] अध्यापना विषयीचा दृष्टिकोन समजतो.

८] मराठी विषयावर प्रभुत्व संपादन करता येते.

९] सरावपाठामुळे विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवता येते.

१०] वार्षिक पाठ्यक्रम कौशल्यपूर्ण रितीने हाताळता येतो.

११] अध्यापन कार्यातून मराठी विषयाची उद्दिष्टे साध्य करता येतात.

सराक्पाठांचे अध्यापन आताच्या नोकरीत उपयोगी पडत नाही. या सदराखाली आलेली उत्तरे पुढे नमुद केली आहेत.

[१] नियोजित कालावधीत वार्षिक पाठ्यक्रम पूर्ण करता येत नाही.

[२] हर्बटच्या पंचपदीचा वापर केला तर वेळ कमी पडतो.

[३] प्रशिक्षण काळात विविध साधनांचा वापर करुन सराक्पाठ पूर्ण करावे लागतात.

[४] पाठ्यपुस्तक संपविण्याच्या जबाबदारीमुळे सर्वांगिण नियोजन करता येते नाही.

[५] प्रशिक्षण काळात सरावपाठ घाईगडबडीत पूर्ण केले जातात.

यावर अशी शिफारस करावीशी वाटते की, पाठ्यपुस्तके हे एक साधन म्हणून त्याचा वापर करावा. नियोजित वेळेत वार्षिक पाठ्यपुस्तकातील अध्यापन करण्याचे कौशल्य अवगत करावे, त्यासाठी स्वत:चे नियोजन असावे.

प्रकरण ४ मधील सारणी क्र. ४.१६ मध्ये [पृष्ठांक ] संबंधित पाठ्यक्रमात दिलेल्या सर्व अभ्यासपूरक कार्यक्रमाचा उपयोग १२.८५ टक्के होते. यावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमा मध्ये दिलेल्या सर्व अभ्यासपूरक कार्यक्रमाचा मराठीत अध्यापन करताना उपयोग होतो. तरीही अशी शिफारस करावीशी वाटते की. -

या अभ्यासपूरक कार्यक्रमा मध्ये काही नवीन उपक्रमांचा समावेश करणे आवश्यक आहे. हे उपक्रम खाली दिले आहेत.

१. काव्यवाचन स्पर्धा

२. निबंध लेखन स्पर्धा

३. पाठ्यपुस्तकातील पाठा संबंधी चर्चा

४. कवीचा परिचय

५. नाट्यीकरण कला / नाट्यमंडळ

६. साहित्यीकांचे व्याख्यान, कथाकथन लेखन

७. सारांश लेखन स्पर्धा.

वरील उपक्रम का असावेत त्याची कारणे पुढे नमूद केल्या प्रमाणे वाली आहेत.

१. काव्यवाचन स्पर्धेमुळे काव्यनिर्मितीस प्रोत्साहन मिळेल, मनोरंजकता, नवनिर्मितीला चालना मिळेल.
२. निबंध स्पर्धेमुळे विद्यार्थ्यांच्या कल्पकतेला आव्हान देता येते.
३. पाठ्यपुस्तकातील पाठांच्या चर्चेमुळे संपूर्ण पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण, टीकात्मक परीक्षण करता येईल.
४. नवनवीन, कवींचा परिचय झाल्यामुळे काव्याची रसीकता वाढेल नाट्यमंडळ/नाट्यीकरण केलेमुळे उपजत कलेला वाव मिळेल.
५. साहित्यीकांचे व्याख्यानामुळे समाजातील संबंध वाढेल. नवीन साहीत्यांची ओळख करुन घेता येईल.
६. सारांश लेखनामुळे विचार प्रवर्तनाला चालना मिळेल.

प्राध्यापकांच्या प्रश्नावलीतील सारणी क्र. ४.१९ [पृष्ठांक१७०] मध्ये मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमा मध्ये पुढील अभ्यासपूरक कार्यक्रम वाढवावेत असे सूचविले आहे ते अभ्यासपूरक कार्यक्रम पुढे दिले आहेत.

१. बहुभाषातील रुपांतरित वाङ्मयाची राष्ट्रीय एकात्मता
२. एकांकिका - इतर प्रांतीयापर्यन्त पोहोचविणे.
३. अभिनय स्पर्धा घेणे व संभाषण चातुर्य अजमाविणे.
४. [हिंदी दिना प्रमाणे ] मराठी दिन साजरा करणे.
५. मराठीची वर्गवार शालेय निहाय कालदरम्यान साहित्य संमेलने भरवावीत.
६. भाषिक कोडी तयार करुन ती सोडवावयास सांगणे.
७. विद्यार्थ्यांगणिक शब्दकोषांची [ २०० शब्द ] निर्मिती करणे.
८. नियतकालिक काढणे, जाहीराती लेखा गोळा करणे.
९. वाचनमंडळ भरविणे, व रसग्रहण क्षमतेचा विकास करणे.

वरील कार्यक्रम शिफारस करण्यासाठी संशोधिकेला योग्य वाटतात.

शिक्षकांच्या प्रश्नावली मधील सारणी क्रमांक ४.२० [ पृष्ठांक ] वरुन असा निष्कर्ष निघतो की, अध्यापन साहित्याची तात्त्विक माहिती देणाऱ्याचे प्रमाण प्रात्यक्षिक किंवा दिग्दर्शन दाखविणाऱ्या प्राध्यापकांच्या संख्येपेक्षा अधिक म्हणजे ८९.२८ टक्के आहे.

प्रकरण चारमधील सारणी क्रमांक ४·२१ [पृष्ठांक ११२ ] मध्ये पाठ्यक्रमात समाविष्ट असलेल्या अध्यापन साहित्याखेरीज इतर अध्यापन साहित्याचाही समावेश केलेला आहे हे अध्यापन साहित्याचाही समावेश केलेला आहे· हे अध्यापन साहित्य पुढे नमूद केले आहे·

१· स्लाईड शो दाखवावेत त्यामुळे नवीन लेखक, कवीचा प्रत्यक्ष माहिती व परिचय करून घेता येईल·

२· ओव्हरहेड प्रोजेक्टर चित्राद्वारे माहिती मिळविता येते·

३· शिक्षक निर्मित अध्यापन साधने – विद्यार्थ्यांनाही प्रवृत्त करता येते·

४· परिसरात उपलब्ध होणारी साधने – साधनाचा संग्रह होईल·

५· आत्मचरित्रपर लेख आदर्श संस्कार घडविता येतात·

६· पौराणीक व दुर्मिळ वस्तूंचे प्रदर्शन भरविणे· त्यामुळे मराठी विषयांशी संबंधित बाबींचा अभ्यास करता येतो·

७· शैक्षणिक सहली काढणे, भाषेतील फरक अभ्यासता येतो·

वर सुचविलेले अध्यापन साहित्य शिफारशीला योग्य वाटते·

शिक्षकाच्या प्रश्नावली मधील सारणी क्रमांक ४·२२ मध्ये [पृष्ठांक ११३ ] मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमात समाविष्ट असणाऱ्या अध्यापन पद्धतीपैकी प्रत्यक्षात उपयोग केल्या जाणाऱ्या अध्यापन पद्धती पुढे नमुद केल्या आहेत·

१· कथन

२· व्याख्यान

३· परिसंवाद

४· उदगामीअवगामी

यापैकी कथन अध्यापन पद्धतीचा उपयोग करणाऱ्या शिक्षकांची संस्था १७ म्हणजे ८५·७१ टक्के आहे· यावरून असा निष्कर्ष निघतो की, कथन अध्यापन पद्धतीचा उपयोग सर्वाधिक केला जातो·

शिक्षकांच्या प्रश्नावली मधील सारणी क्रमांक ४·२३ मध्ये [पृष्ठांक ११४ ] असा निष्कर्ष काढता येतो की, जून १९९४ पासून माध्यमिक स्तरावर मराठी विषयाचा जो पुर्नरचित अभ्यासक्रम सुरु आहे त्यासाठी हा मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम १९९४ पासून माध्यमिक स्तरावर चालू असलेल्याच पुर्नरचित

अभ्यासक्रमास उपयुक्त आहे.

शिक्षकांच्या प्रश्नावली मधील सारणी क्रमांक ४.२४ मध्ये [पृष्ठांक११५] मराठी विषय शिकवित असताना हा पाठ्यक्रम अत्युत्कृष्ठ पंचबिंदूश्रेणीत ४२.८५ टक्के उपयुक्त ठरतो. उत्कृष्ठ स्तंभात ३५.७१ टक्के उपयुक्त ठरतो. उत्तम या श्रेणीत २१.४२ टक्के उपयुक्त ठरतो. असा निष्कर्ष काढता येतो. यावरुन संबंधित पाठ्यक्रम उत्कृष्ट आहे हे सिध्द होते.

प्रकरण चार मधील सारणी क्रमांक ४.२५ मध्ये [ पृष्ठांक ११५ ] अधिव्याख्यात्यांच्या मते माध्यमिक स्तरावर शिकविण्यासाठी प्रशिक्षणार्थ्यांना विविध अध्यापन पध्दतीचा वापर हा पाठ्यक्रम पुरेसा आहे. हा पाठ्यक्रम ८६.६६% टक्के आहे. तर हा पाठ्यक्रम संबंधित बाबीसाठी १३.३३ टक्के उपयुक्त नाही. यावरुन अशी शिफारस करावीशी वाटते की,

१. सध्या ज्या आंतरराष्ट्रीय घडामोडी आशय स्वरुपात पुढे येत आहेत. त्या संबंधी अध्यापन पध्दती मध्ये ही आशयानुसार परिवर्तन व सुयोग्य बदल होणे आवश्यक आहे.

२. भाषांतरित व रुपांतरित वाङ्‌मयाचा अभ्यासाचा विचार होणे आवश्यक आहे.

अध्यापकांच्या प्रश्नावली मध्ये काळाच्या गरजे नुसार हा पाठ्यक्रम अनुरुप वाटतो का ? ते विचारले होते. याला मिळालेली होकारार्थी विधाने पुढे दिली आहेत.

१. काळाच्या गरजेनुसार पाठ्यक्रमात पुरेशी भर टाकणे आवश्यक व अपरिहार्य आहे.

२. पाठ्यक्रमात नाविन्य उमटले पाहिजे. भाषा नवस्वरुप स्पष्ट करावे. २१ व्या शतकाकडे जाणा-या जागतिक घटना व भारतातील घटना शोध, प्रयत्न यांचे नवे प्रतिबींब उमटण्यासाठी अद्यावतपणा पाहिजे. यासाठी नवीन भाषिक प्रयोगशाळा असावी.

३. काकाच्या गरजेनुसार हा पाठ्यक्रम उपयुक्त ठरतो. फक्त नवीन मूल्यमापनाच्या अद्यावत पद्दतीचा अवलंब व त्याचा कृती कार्यक्रम आखला आहे.

४. नवीन शैक्षणिक धोरणानुसार माध्यमिक शाळेतील अभ्यासक्रम बदलण्यात आलेला आहे. तो पाठ्यक्रमाच्या दृष्टिने योग्य वाटतो.

काकाच्या गरजे नुसार हा पाठ्यक्रम उपयुक्त वाटत नाही. त्या नकारार्थींची विधाने पुढे स्पष्ट केली आहेत.

१. नवनवीन शैक्षणिक तंत्राचा साधनाचा मराठी अध्यापनात प्रभावी उपयोग करुन घेण्याच्या दृष्टिने पाठ्यक्रमात बदल करावा.

२. काही अध्यापन पद्दतीवर नव्याने सविस्तर लेखन केले पाहिजे. अध्यापन पद्दती व दैनंदिन शालेय वातावरण समन्वय यावर विचार केला पाहिजे. उदा.

वर मराठीत लेखन कमी आहे. इक्लैष्टिक मेथडची माहिती अपुरी आहे.

३. मराठी भाषेतील नवप्रवाहास वाव देणे आवश्यक आहे.

वरील विधानावरुन अशी शिफारस करावीशी वाटते की,

१. नवनवीन शैक्षणिक तंत्राचा, साधनाचा मराठी अध्यापनात प्रभावी उपयोग करुन घेण्याच्या दृष्टिने पाठ्यक्रमात बदल करणे आवश्यक आहे.

२. काही अध्यापन पद्दतीवर नव्याने सविस्तर लेखन करणे आवश्यक आहे.

३. मराठी भाषेतील नवप्रवाहास वाव देणे आवश्यक आहे.

अध्यापकांच्या प्रश्नावली मध्ये सारणी क्रमांक ४.२६ वरुन [पृष्ठांक २२८ ] प्रशिक्षणार्थ्यांना वेगवेगळ्या अध्यापन पद्दतीतून पाठ घेण्याविषयी हा पाठ्यक्रम ८०.०० टक्के न्याय देतो. आणि २०.०० टक्के प्रशिक्षणार्थ्यांना वेगवेगळ्या अध्यापन पद्दतीतून पाठ घेण्या विषयी हा पाठ्यक्रम न्याय देत नाही.

यावरून अशी शिफारस करावीशी वाटते की, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमा मध्ये नवीन अध्यापन पद्धतीची भर घालणे आवश्यक आहे.

अध्यापकांच्या प्रश्नावली मध्ये प्रश्न क्रमांक २२ वरून असा निष्कर्ष निघतो की माध्यमिक उच्च माध्यमिक शाळांमधील मराठी विषयाच्या पुर्नरचित अभ्यासक्रमानुसार हा पाठ्यक्रम ९३.३३ टक्के उपयुक्त आहे. आणि ६.६७ टक्के पाठ्यक्रमात उपयुक्तता नसल्याची कारणे पुढे दिली आहेत.

हा पाठ्यक्रम ब-याच जुन्या बाबींना पुढे नेतो. तो केल्या सारखा वाटतो. नवीन अभ्यासक्रम संदर्भात तो रेल्वेला डब्बा जोडल्या सारखा वाटतो.

या अडचणीच्या कारणा वरून अशी शिफारस करावीशी वाटते की, मराठी विषयाच्या पुर्नरचित अभ्यासक्रमानुसार हा पाठ्यक्रम मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमात बदल करणे आवश्यक आहे.

प्रश्नावली मध्ये सारणी क्रमांक ४.२७ नुसार [ पृष्ठांक २२० ] अशी शिफारस करावीशी वाटते. की, मराठी अध्यापन पद्धतीचा पाठ्यक्रम समाधानकारक होण्यासाठी

१. पाठ्यक्रम नव्या आंतरराष्ट्रीय संदर्भांवर भर देणारा असणे आवश्यक आहे.
२. प्रत्यक्ष शाळेत या अध्यापन पद्धतीने शिकविताना येणा-या अडचणी व त्यावर उपाय याचा विचार व्हावा.
३. पाठ्यक्रमात दैनंदिन जीवनात येणा-या अडचणीचा परामर्श घेता येणे आवश्यक आहे.
४. भाषा हा एक सखोलपणे अभ्यासण्याचा विषय असल्याने त्या दृष्टिने त्याची रचना होणे आवश्यक आहे. केवळ पुस्तकी स्वरूप ठेवणे गैर आहे.
५. गुणात्मक तत्त्वावरच अभ्यासक्रमाची रचना असावी.
६. मराठी अध्यापन पद्धतीवरच्या संशोधनाचा पाठ्यक्रम रचनेत विचार व्हावा.

७] अध्यापनात अधिक सूक्ष्मता येणे आवश्यक आहे.

८] मूल्य शिक्षणाचे संदर्भात उपयुक्त अध्यापन पद्धती बद्दल निश्चित मार्गदर्शन व्हावे.

९] मराठी भाषेचा पाठ्यक्रम सर्व अध्यापन पद्धतीच्या अभ्यासास उपयुक्त व्हावा.

१०] पाठ्यक्रमाला मर्यादा असू नयेत. — ?

प्रकरण ४ मधील सारणी क्रमांक ४.२८ वरुन [पृष्ठांक १२१ ]मराठी भाषेच्याविविध अंगोपांगाचे अध्यापन करण्यास शिक्षकांना हा अभ्यासक्रम ८०.०० टक्के सामर्थ्य देतो. आणि २०.०० टक्के समर्थ बनवित नाही. त्यामध्ये अशी शिफारस करावीशी वाटते की, समर्थ बनविण्यास सामर्थ्याचा अनुभव असणे आवश्यक आहे. शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. (विषय, आशय, तंत्रे या सर्वांची दर तीन वर्षांनी पुर्नरचना करणे आवश्यक आहे.)

प्रकरण ४ मधील सारणी क्रमांक ४.२९ वरुन [पृष्ठांक १२२ ] असा निष्कर्ष काढता येतो की, नवीन काळाच्या गरजेनुसार हव्या असलेल्या शिक्षकांची निर्मिती या पाठ्यक्रमाने ७३.३३ टक्के होईल. आणि २६.६६ अशी टक्के होणार नाही.

यावर संशोधिकेला अशी शिफारस करावीशी वाटते की, काळा प्रमाणे मराठीच्या पाठ्यक्रमात बदल होणे आवश्यक आहे. शिक्षकांचे अष्टपैलुत्व सिध्द होण्यासाठी आणखी शैक्षणिक अनुभव शोधून ते विवेचित करणे आवश्यक आहे. नवीन काळाच्या प्रवाहातील प्रश्न सोडविण्यास शिक्षक समर्थ बनवावेत.

प्राध्यापकाच्या प्रश्नावली मधील २५ प्रश्नावरुन मिळालेल्या अन्य उपयुक्त माहिती वरुन संशोधिकेला अशी शिफारस करावीशी वाटते की,

१. मराठी पाठ्यक्रमाचा विचार करताना मूल्यसंवर्धनाला महत्त्व देण्याचा योजना पाठ्यक्रमात असणे आवश्यक आहे.

२. तात्त्विक भाग व्यवहाराशी सांगड घालणारा असणे आवश्यक आहे. भावनिक काल्पनिक वाड:मयाचा अध्यापनाच्या वेळी हा तर्कतत्वाचा भाग पूर्णत: अमलात आणताना अडचणी येवू नयेत. पाठ्यक्रमाच्या घटकाची रचना व अनुक्रम विद्यार्थ्यांच्या त्या त्या शाळातील मराठीच्या दैनंदिन अध्यापनाच्या संदर्भात तयार करणे आवश्यक आहे.

३. पाठ्यक्रमा बरोबरच मराठीच्या प्राध्यापकांनी आपल्या दैनंदिन आचरणात आदर्श दाखविणे आत्यावश्यक आहे.

४. मराठी शिक्षकांनी आपला व्यावसायिक विकास साधावयाचा असल्यास (सद्यांची) प्रभावाखाली प्रसार माध्यमे अध्यापनात वापरणे आवश्यक आहे.

५. मराठी पाठ्यक्रम हा शहरी व ग्रामीण भागाशी सुसंवाद साधणारा असणे आवश्यक आहे.

१८ मराठी अध्यापन पध्दती या विषयाच्या पाठ्यक्रमातील प्रात्यक्षिक कार्य अधिकाधिक
===========================================================
समृध्द व संपन्न करण्या संबंधी निष्कर्ष व शिफारशी :-
======================================

सारणी क्रमांक ४.३० मध्ये [पृष्ठांक १ २ ४ ] वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, मराठी अध्यापन पध्दतीच्या पाठ्यक्रमाचे प्रात्यक्षिक कार्य आता करत असलेल्या नोकरीत ५०.०० टक्के"फार" फायद्याचे आहे. १४.२८ % टक्के फारसा फायदा होत नाही. आणि ३५.७१ टक्के थोडासा फायदा होतो. परंतु शिक्षणशास्त्र महाविद्यालयामध्ये केलेल्या प्रात्यक्षिक कार्याचा अजिबात उपयोग होत नाही. असे म्हणताच येत नाही.

अध्यापकाच्या प्रश्नावली मधील तिस-या भागातील प्रात्यक्षिक कार्याच्या पहिल्या प्रश्नावरुन असा निष्कर्ष काढता येतो की, विविध अध्यापन पध्दतीची केवळ तात्त्विक माहिती न देता मराठी विषयाशी संबंधित प्रत्यक्षात त्या अध्यापन पध्दती कशा वापरावयाच्या याचे दिग्दर्शन व मार्गदर्शन देणे आवश्यक आहे असे मराठी अध्यापन पध्दती शिकविणा-या अध्यापकांचे मत आहे.

सारणी क्रमांक ४.३१ मध्ये [पृष्ठांक १ २ ६ ] दिलेल्या माहितीवरुन असा निष्कर्ष काढता येतो की, संबंधित पाठ्यक्रमातील क्रमबध्दता"योग्य" आहे असे म्हणणा-या शिक्षकांची संख्या ७३.३३ टक्के, संबंधित पाठ्यक्रमातील क्रमबध्दता "अयोग्य" आहे म्हणणा-या शिक्षकांच्या संख्ये पेक्षा [ २८.५७ ] अधिक आहे.

पाठ्यक्रमातील प्रकरणांच्या क्रमबध्दते विषयी अशी शिफारस करावीशी वाटते की मराठीच्या अंगोपांगाचे अध्यापन हा घटक क्रमाने असावा. पाठ्यक्रमाचा क्रम उपयोगिता मूल्यावर असावा. जून १९९४ च्या पुर्नरचित अभ्यासक्रमास न्याय देणारा असावा. तसेच मराठीचा शिक्षक, उद्दिष्टे, पाठनियोजन, अध्ययन अनुभव, अध्यापन साहित्य यांना प्राधान्यक्रम दयावा.

सारणी क्रमांक ४.३२ वरुन [पृष्ठांक १२८ ] वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, प्रशिक्षणार्थ्यांना सर्वसाधारण सामान्य अध्यापन कौशल्य क्षमता प्राप्त करण्याच्या दृटी दृष्टीने सूक्ष्म सूक्ष्म अध्यापन कौशल्ये ६०.०० टक्के समाधानकारक आहेत आणि ४०.०० असमाधानकारक आहेत.

सूक्ष्म अध्यापन कौशल्याच्या बाबतीत संशोधिकेला अशी शिफारस करावीशी वाटते की, मराठी अध्यापन पध्दतीच्या शिक्षकांना अध्यापन पध्दतीशी संबंधित असलेली सर्व सूक्ष्म अध्यापन - कौशल्ये आत्मसात करता येणे आवश्यक आहे. त्यांना सर्व अध्यापन पध्दतीच्या सूक्ष्म अध्यापन कौशल्याचे बारकावे लक्षात आणून देता येणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ४.३३ [ पृष्ठांक १२९ ] वरुन सूक्ष्म अध्यापन कौशल्यामध्ये शास्त्रीय व शैक्षणिक उपकरणाचा सुयोग्य वापर करता येणे आवश्यक आहे. प्रकटवाचन आणि मूकवाचन कौशल्य घेणे आवश्यक आहे. फलकलेखन, प्रश्न स्पष्टीकरण, कौशल्य घेणे आवश्यक आहे. अशी शिफारस करावीशी वाटते.

सारणी क्रमांक ४.३४ [ पृष्ठांक १३० ] वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्राबद्दल समाधानी असणाऱ्यांचे प्रमाण ६६.६६ टक्के आहे. आणि ३३.३३ टक्के असमाधान आहे.

आशययुक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्र अधिक चांगल्या पध्दतीने घेता यावे यासाठी अशी शिफारस करावीशी वाटते की, आशयानुसार अध्यापन पध्दतीचा वापर करुन अध्ययन - अध्यापन प्रक्रिया प्रभावी करणे आवश्यक आहे. विषयज्ञान होणे आवश्यक आहे. कृतिसत्र कार्यान्वित आयोजनाच्या दृष्टिने यशस्वी झाले पाहिजे. आशय युक्त अध्यापन पध्दतीच्या कृतिसत्राची संकल्पना स्पष्ट होणे आवश्यक आहे. अल्पावधीत सर्व संकल्पना समजावून देता घेता येणे आवश्यक आहे. कृतिसत्रात समाविष्ट केलेले घटक व कृतिसत्राचे नियोजन यांच्यातील संदिग्धता काढून टाकता

देणे आवश्यक आहे. आशयावर प्रभुत्व व मिळविण्यास प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे. आशययुक्त अध्यापना बद्दल सविस्तर सूक्ष्म मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे. शंका निरसन होणे आवश्यक आहे. आशयासहित अध्यापनाची पाठटाचणे "नमुना" म्हणून मिळाली पाहिजे. [ मराठीच्या सर्व अध्यापन पद्धतीना पाय-या असाव्यात.

आशययुक्त पद्धतीच्या कृतिसत्रामुळे मराठी अध्यापन पद्धतीच्या कृतिसत्रामुळे मराठी अध्यापन पद्धतीच्या कृतिसत्रामुळे मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमातील आशय व पाठ्यपुस्तकातील आशय यातील संबंधाविषयी असा निष्कर्ष काढता येतो की, आशययुक्त अध्यापन पद्धतीच्या कृतिसत्रामुळे उद्दिष्टामुळे पाठ्यक्रमातील आशय सखोल पाठपुरावा केला जातो. विश्लेषणामुळे घटकांच्या अंतरंगात शिरणे सोपे जाते. आशयानुरूप अध्यापन पद्धती, अनुभव, मूल्य साधने यांचा सुयोग्य समन्वय साधला जातो. आशययुक्त अध्यापनाच्या स्वजाणीवेला चालना देता येते. काही आशयाचे उपमुद्दे पाडता येतात. आशयाचे महत्व पटते. आशयानुसार अध्यापन पद्धती मूळ धरू लागतात. अध्यापनास योग्य ती दिशा मिळते. आशयाची विविध अंगे, पैलू इ. वर प्रकाश टाकता येतो. मराठी अध्यापन पद्धतीच्या वर्गीकरणानुसार पाठ्यपुस्तकातील आशयाचे विश्लेषण करून एकमेकांचा परस्पर संबंध साधता येतो.

आशय आणि अध्यापन पद्धती यांचे सहेतुक एकात्मीकरण करण्याच्या तत्वांचे आचरण करण्यास व त्यानुसार निरीक्षणक्षम कौशल्ये विकसित करण्यास मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचे कृतिसत्र ६६.६६ टक्के लाभदायी ठरते. यावरून असा निष्कर्ष काढता येतो की, आशय व स्तरानुसार अध्यापन पद्धतीचा वापर केला जातो. चर्चेतून, कृतितून एक नवा अनुभव मिळतो, चुकत चुकत शिकण्याची एक संधी मिळते. मूळ संकल्पना साकार होते. प्रशिक्षणार्थी संबोध शोधून काढू शकतात. शिक्षकास संबोध निर्मितीचा अर्थ समजतो. कृतिसत्राने एक दृष्टी येते. वाङ्मय प्रकारानुसार त्यांची वैशिष्ठे लक्षात घेवून अध्यापन पद्धतींचा वापर करता येतो, पाठटाचणात सूक्ष्मता येते. सरधोपट वृत्ती जाते. आशय पद्धतीचा विचार होतो. मराठी भाषेचा व मराठी अध्यापनाची उद्दिष्टे यांचाच संबंध येथे येतो. आशय विश्लेषण, संरचना यामुळे घटकांचे स्थान व त्यातील संबोध, संज्ञा नेमक्या समजतात. घटकाचा विचार विविध अंगानी करता येतो. त्यामुळे अध्यापन दर्जेदार होवू शकते. आशयानुसार अध्यापन पद्धतींचा वापर करून अध्ययन अध्यापन प्रक्रिया प्रभावी

बनवता येते.

आशय आणि अध्यापन पद्धती यांचे सहेतुक एकात्मीकरण करण्याच्या तत्वाचे आचरण करण्यास व त्यानुसार निरीक्षण कौशल्ये विकसीत करण्यास मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमाचे कृतिसत्र ३३.३३ टक्के लाभदायी ठरत नाही. यावरून संशोधिकेला अशी शिफारस करावीशी वाटते की, मराठीचे आशययुक्त अध्यापन हे अध्यापकाच्या अंगभूत कौशल्यावर आधारीत असते. कृतिसत्रातील वातावरण हे कृत्रिम असते. आशयाशी समरस होण्यास वर्गवातावरण असणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ४.३७ वरून [पृष्ठांक १३७ ] असा निष्कर्ष काढता येतो की, पाक्षिक शाळेमध्ये राबविलेल्या उपक्रमाचा ९२.८५ टक्के उपयोग प्रशिक्षणार्थ्यांना होतो. ७.१४ टक्के प्रशिक्षणार्थ्यांना पाक्षिक शाळेमध्ये राबविलेल्या उपक्रमाचा उपयोग होत नाही. त्याची कारणे अभ्यासून अशी शिफारस करावीशी वाटते की पाक्षिक शाळेचे नियोजन करण्यातील अडचणी दूर करणे आवश्यक आहे. पाक्षिक शाळेतील कामकाज करणेसाठी अनुभव असणे आवश्यक आहे. शाळेत भरपूर उपक्रम राबवावे लागतात. तर नियोजित उपक्रम राबविण्यासाठी पुरेसा कालावधी मिळणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ४.३८ वरून [पृष्ठांक १३८ ] असा निष्कर्ष निघतो की, माध्यमिक शाळेसाठी शिक्षक तयार करणेसाठी प्रशिक्षणार्थ्यांना ठेवलेली पाठसंख्या ६०.०० टक्के पुरेशी आहे. आणि ४०.०० टक्के माध्यमिक शाळेसाठी शिक्षक तयार करणेसाठी प्रशिक्षणार्थ्यांना ठेवलेली पाठसंख्या पुरेशी नाही. त्यावरून अशी शिफारस करावीशी वाटते की गद्य, पद्य, व्याकरण, रचना यावर किमान एक पाठ प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांने प्रशिक्षणकाळात घेणे आवश्यक आहे. सराव पाठांची मराठी अध्यापन पद्धतीची संख्या १६ असणे आवश्यक आहे. प्रशिक्षणात अध्यापक घडवायचा असतो म्हणून किमान १० चांगले पाठ, वार्षिक पाठ म्हणून द्यावेत आणि ०६ पाठ गडबडीत घेतल्यास चालणे, आवश्यक आहे. प्रशिक्षणात अध्यापक घडविणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ४.३९ वरून [पृष्ठांक १३९ ] असा निष्कर्ष काढता येतो की, प्रशिक्षणार्थ्यांना सरावपाठांना मार्गदर्शन देण्यासाठी आपणास पुरेसा वेळ मिळतो असे मत मांडणाऱ्या अधिव्याख्यात्यांचे प्रमाण ५३.३३ टक्के आहे आणि ४६.६६ टक्के प्रशिक्षणार्थ्यांना सरावपाठांना मार्गदर्शन देण्यासाठी पुरेसा वेळ मिळत नाही.

यावरुन अशी शिफारस करता येते की, मराठी अध्यापन पद्धतीच्या पाठ्यक्रमासाठी १ वर्षे ६ महिने कालावधी करणे आवश्यक आहे।

सारणी क्रमांक ४·४० वरुन [पृष्ठांक १४० ] असा निष्कर्ष काढता येतो की, सलग सराव पाठांबाबत समाधानी असणाऱ्या अधिव्याख्यात्यांची ६६·६६ टक्केवारी आहे· आणि असमाधान असणाऱ्या अधिव्याख्यात्यांची ३३·३३ टक्केवारी आहे·

असमाधानी असणाऱ्या अधिव्याख्यात्यांच्या कारणावरुन असा निष्कर्ष काढ काढता येतो की, सलग सरावपाठांमुळे त्या त्या घटकांची पुरेशी तयारी त्या त्या वेळेत करणे आवश्यक आहे· सराव पाठ वार्षिक पाठ समजून घेणे आवश्यक आहे·

सारणी क्रमांक ४·४१ वरुन [पृष्ठांक १४२ ] वरुन असा निष्कर्ष निघतो की, सलग सराव पाठांसंबंधीचे नियोजन ३३·३३ टक्के योग्य आहे आणि ६६·६६ टक्के अयोग्य आहे·

यावरुन अशी शिफारस करावीशी वाटते की, सलग सरावपाठ नियोजन व्यवस्थित, चांगले राबविता आले पाहिजेत· स्वाध्याय तपासण्यासाठी वेळ राखून ठेवणे आवश्यक आहे· सलग सराव पाठ घेण्याऐवजी शालेय कामकाज व शालेय पद्धती आणून घेण्यावर भर देणे आवश्यक आहे· सलग सराव पाठामध्ये प्रास्ताविकाचे टाचण किती व कसे दीर्घ करावयाचे, त्याचे मार्गदर्शन मिळणे आवश्यक आहे· नियोजनातील प्रत्येक बाब सूक्ष्मपणे कार्यवाहित आणणे आवश्यक आहे·

सारणी क्रमांक ४·४२ वरुन [पृष्ठांक १४३ ] अशी शिफारस करता येते की, अभ्यासपूरक कार्यक्रम भाषिक कार्यक्रम प्रशस्तिपत्रके, हस्तलिखित इत्यादी बाब सलग सराव पाठातील प्रशिक्षण कार्यक्रमात अंतर्भूत करणे आवश्यक आहे·

सारणी क्रमांक ४·४३ वरुन [पृष्ठांक १४४ ] अशी शिफारस करता येते की, पाक्षिक शाळेतील घाईगडबडीमुळे अधिव्याख्यात्यांच्या मनावर येणारे दडपण, भीती दूर करुन कार्यात कुशलता प्रकट करण्यास प्रोत्साहन मिळणे आवश्यक आहे· अध्यापकांच्या

जवळील अनेक कलागुणांना वाव देऊन प्रशिक्षणार्थ्यांत तशा प्रकारची कौशल्ये आत्मसात होतील एवढा पुरेसा कालावधी पाक्षिक शाळेला मिळणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ४.४३ वरून असा निष्कर्ष काढता येतो की, पाक्षिक शाळेचा प्रशिक्षण उपक्रम समाधानकारक वाटतो असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची ७३.३३ टक्केवारी आहे तर २६.६६ टक्के अधिव्याख्यात्यांचे पाक्षिक शाळेतील उपक्रमाबाबत असमाधान आहे.

सारणी क्रमांक ४.४४ वरून [पृष्ठांक १७५ ] असा निष्कर्ष काढता येतो की, प्रात्यक्षिक पाठ परीक्षा समाधान कारक आहे असे म्हणणाऱ्या अधिव्याख्यात्यांची टक्केवरी ८६.६६ इतकी आहे. १३.३३ टक्के प्रात्यक्षिक पाठ परीक्षेबद्दल असमाधान आहे. प्रात्यक्षिक पाठ परीक्षेच्या असमाधानावरून अशी शिफारस करता येते की, वेगवेगळ्या अध्यापन पद्धतीने पाठ घेतले जाणे आवश्यक आहे. प्रात्यक्षिक पाठ परीक्षेचे मूल्यमापन सुधारित पद्धतीने व्हावे. सतत मूल्यमापन करणे आवश्यक आहे. मूल्यमापन स्वतंत्र पद्धतीने होणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ४.४५ वरून [पृष्ठांक १७७ ] असा निष्कर्ष काढता येतो की, मूल्यमापन कृतिसत्राचा ८९.२८ टक्के उपयोग होतो आणि १०.७१ टक्के मूल्यमापन कृतिसत्राचा उपयोग होत नाही.

मूल्यमापन कृतिसत्र उपयोगी होण्याच्या दृष्टीने अशी शिफारस करावीशी वाटते की, मराठी अध्यापन पद्धतीच्या प्रात्यक्षिक कार्यामध्ये मूल्यमापन कृतिसत्र सक्तीचे करणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ४.४६ वरुन असा निष्कर्ष काढता येतो की, मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमातून तयार झालेला प्रशिक्षणार्थी शाळेतील मूल्यमापनाची जबाबदारी पार पाडण्यासाठी ८०.०० टक्के सामर्थ्यशाली ठरु शकतो.

मूल्यमापन कृतिसत्राचे सामर्थ्य वाढविण्यासाठी अशी शिफारस करावीशी वाटते की, मूल्यमापनाच्या संकल्पनेत अंतर्भूत असलेल्या सर्व निकषानुसार मूल्यमापन होणे आवश्यक आहे. मूल्यमापन कृतिसत्रात सुसूत्रीपणा असणे आवश्यक आहे. "पाठाची टाचणे काढणे म्हणजे मूल्यमापन" हा गैरसमज दूर होणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थ्यांला कृतिसत्राचे सर्व संबोध स्पष्ट व्हावेत.

सारणी क्रमांक ४.४७ वरुन [पृष्ठांक १४९ ] मूल्यमापन कृतिसत्र कार्यक्रमाबद्दल ८०.०० टक्के समाधान आहे. असा निष्कर्ष काढता येतो.

मूल्यमापन कृतिसत्रातील असमाधान घालविण्याच्या दृष्टीने अशी शिफारस करता येते की, मूल्यमापन कृतिसत्रातील कृतीकार्यक्रमांची अंमलबजावणी काटेकोरपणे होणे आवश्यक आहे.

सारणी क्रमांक ४.४८ वरुन [पृष्ठांक १५० ] संशोधनाशी संबंधीत इतर उपयुक्त माहितीच्या अनुषंगाने अशी शिफारस करता येते की, विद्यार्थ्यांना वाचनाचा छंद लावण्यासाठी शिक्षकांनी प्रयत्न करणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना सतत नवनवीन माहिती देऊन त्यांच्या शब्दसंचयात भर घालणे आवश्यक आहे. काव्यवाचन, कथाकथन, निबंधस्पर्धा या सर्वांची माहिती देऊन विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर घालणे आवश्यक आहे. शब्दकोशांचा वापर करुन शिक्षकांनी नवीन शब्दांचे अर्थ, रंग, रुप विद्यार्थ्यांना समजाउन सांगणे आवश्यक आहे. महिन्यातून एकदा विद्यार्थी-शिक्षक--पालक यांचा मेळावा आयोजित करुन त्याद्वारे विद्यार्थ्यांच्या अडीअडचणी सोडवून देऊन निबंध काव्ये, कथाकथन यांची माहिती देऊन विद्यार्थ्यांना ज्ञानार्थी बनविणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांचे पूर्वानुभव जाणून घेणे आवश्यक आहे. साहित्यीकांचा परिचय करुन त्यांचे कार्य समजावून द्यावे. भाषा सुधारुन साहित्याचा अध्यापन करणे आवश्यक आहे. मराठी अध्यापन पद्दतीचा पाठ्यक्रम व्यापक असल्यामुळे कालावधी वाढविणे आवश्यक आहे. मराठी अध्यापन पद्दती मूलभूत भाषा म्हणून तिचे इतर अध्यापन पद्दतीच्या शिक्षकांनी अध्यापन करणे आवश्यक आहे. मराठी विषयाच्या अध्यापन पद्दती वाढविणे, आवश्यक आहे. सलग सराव्पाठांसाठी पाक्षिक शाळेऐवजी त्रैमासिक किंवा मासिक शाळा करुन बी.एड्. पदवीचा कालावधी वाढवावा. सूक्ष्म अध्यापन कालावधी वाढविणे गरजेचे आहे. वार्षिक परीक्षा समजून तोंडी परीक्षा घ्याव्यात. व्याकरण व व्याकरणातील मराठी विषयाचे महत्त्व, व्याकरणाचा प्रत्यक्षात वापर कसा करायचा याविषयी माहिती असणे आवश्यक आहे. मराठी अध्यापन पद्दतीच्या पाठ्यक्रमातील तात्त्विक भाग केवळ माहिती देऊन शिकविण्याऐवजी त्याची प्रात्यक्षिके करुन दाखविणे अत्यंत गरजेचे आहे. साहित्यिक व विद्यार्थी यांची वर्षातून एकदा किंवा दोनदा चर्चा घडवून आणावी. प्रात्यक्षिक कार्यातील लेखनकार्यांचा बोजा कमी करावा. सामाजिक समस्या घेऊन त्या समस्येचे साहित्यिक माध्यमातून स्पष्टीकरण व उपाय यावर चर्चा करावी. मराठी अध्यापन पद्दतीसाठी